## राज्याचा धरणसाठा

बुधवारी (ता. ५) सकाळी आठ वाजेपर्यंतचा धरणांतील उपयुक्त पाणीसाठा (टीएमसी)

| धरण | एकूण क्षमता | आजचा साठा | |
|---|---|---|---|
| **पुणे विभाग** | | | |
| टेमघर | ३.७१ | २.४४ | ६५ |
| वरसगाव | १२.८२ | १२.८२ | १०० |
| पानशेत | १०.६५ | १०.६५ | १०० |
| खडकवासला | १.९७ | १.९४ | ९९ |
| पवना | ८.५१ | ८.५१ | १०० |
| मुळशी | १८.४६ | १८.२५ | ९९ |
| चासकमान | ७.५८ | ७.५८ | १०० |
| भामा आसखेड | ७.६७ | ७.६७ | १०० |
| भाटघर | २३.५० | २३.४१ | १०० |
| नीरा देवघर | ११.७२ | ११.७२ | १०० |
| माणिकडोह | १०.१७ | ७.५६ | ७४ |
| डिंभे | १२.४९ | १२.२९ | ९८ |
| घोड | ५.४७ | ५.०८ | ९३ |
| उजनी* | ११७.२१ | ११७.२१ | १०० |
| धोम | ११.६९ | ११.१९ | ९६ |
| कण्हेर | ९.५९ | ९.२१ | ९६ |
| उरमोडी | ९.६५ | ९.५० | ९८ |
| कोयना* | १०५.२४ | १०४.१८ | ९९ |
| वारणा | २७.५५ | २६.०५ | ९५ |
| राधानगरी | ७.७७ | ७.४८ | ९६ |
| दूधगंगा | २३.९७ | २३.०५ | ९६ |
| **मराठवाडा विभाग** | | | |
| जायकवाडी* | १०२.६७ | ६२.३१ | ६१ |
| निम्न दुधना | ८.५४ | २.२२ | २६ |
| मांजरा | ६.२५ | ०.२१ | ३ |
| माजलगाव | १०.९८ | ०.०४ | ० |
| पूर्णा येलदरी | २८.६० | २.६१ | ९ |
| **नाशिक विभाग** | | | |
| निळवंडे | ८.१९ | ७.०६ | ८६ |
| भंडारदरा | १०.७३ | १०.७३ | १०० |

* उजनी (६३.६५ टीएमसी), कोयना (५.१२ टीएमसी), जायकवाडीचा (२६.०५ टीएमसी) पाणीसाठा हा कंसातील अचल पातळीतील साठा मिळून आहे.

# नांदेड जिल्ह्याच्या ग्रामीण भागात चार लाख स्वच्छतागृहे

## जिल्ह्यात स्वच्छता चळवळ गतिमान; पायाभूत सर्वेक्षणानुसार स्वच्छतागृहांची बांधकामे

**नांदेड (प्रतिनिधी) :** नांदेड जिल्ह्यातील १ हजार ३०४ ग्रामपंचायतीअंतर्गतच्या गावांमध्ये १९९९ पासून यंदापर्यंत ४ लाख ९ हजार ९५८ स्वच्छतागृहांची बांधकामे झाली आहेत. पायाभूत सर्वेक्षणानुसार स्वच्छतागृहांची बांधकामे करून त्यांचा वापर केला जात असल्यामुळे जिल्हा हागणदारीमुक्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

पायाभूत सर्वेक्षणानुसार २०१७-१८ मध्ये जिल्ह्यातील १ हजार १९४ ग्रामपंचायतीअंतर्गतची गावे, वाड्या, वस्त्या, तांडे आदी ठिकाणी १ लाख ९२ हजार ५३७ स्वच्छतागृहांची बांधकामे पूर्ण झाली आहेत. नांदेड जिल्ह्याला सर्वाधिक स्वच्छतागृहे बांधकामाचे उद्दिष्ट होते. त्यानुसार जिल्ह्यातील गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, संपर्क अधिकारी यांच्या बैठका घेऊन जिल्ह्यात मिशन मोडमध्ये स्वच्छतागृह बांधकामाला सुरवात केली.

> येत्या काळात जिल्ह्यातील गावांमध्ये सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आदी बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे.
>
> **– जी. एल. रामोड,** उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता व पाणीपुरवठा) जि. प. नांदेड.

यामध्ये मिशन १८१, फास्ट ट्रॅक ७५, फास्ट ट्रॅक १००, फोर्स फिनिक्स, मिशन दस अश्वमेध, मिशन लक्षवेध आदी उपक्रम राबवून जिल्ह्यात २०१७-१८ या वर्षात १ लाख ९२ हजार ५३७ स्वच्छतागृहांची बांधकामे पूर्ण झाली. त्यानुसार नांदेड जिल्हा २३ मार्च २०१८ रोजी हागणदारीमुक्त झाल्याचे जाहीर करण्यात आले. यावर्षात १ हजार १९४ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत. १९९९ ते २०१८ या कालावधीत जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील स्वच्छतागृहांची संख्या एकूण ४ लाख ९ हजार ९५८ एवढी झाली आहे. त्यामुळे १ हजार ३०४ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात स्वच्छता चळवळ गतिमान केली जात आहे, असे सूत्रांनी सांगितले.

तालुकानिहाय स्वच्छतागृहांची संख्या नांदेड २२१८१, अर्धापूर ११८१३, भोकर १८३२२, बिलोली २३५५७, देगलूर २८५४५, धर्माबाद ११५८२, हदगाव ४२३८३, हिमायनगर १७५२७, कंधार ३९८६८, किनवट ४१०४३, लोहा ३६६२३, माहूर १६१९२, मुदखेड १४९७०, मुखेड ३७४४८, नायगाव ३१५३९, उमरी १५९०५.



**गोजेगाव, जि. हिंगोली : पोळा सणासाठी बैल जोडीचे साज सामान तयार करण्यासाठी सुताला गिरक्यावर पीळ देताना येळी येथील शेतकरी विष्णू नागरे.**
(छायाचित्र : **रमेश सांगळे,** गोजेगाव)

# परभणी येथे भुसार मालाची खरेदी ठप्प

**परभणी (प्रतिनिधी) :** परभणी बाजार समितीतील शेतीमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार बुधवारी (ता. ५) देखील बंद होते. दरम्यान, नांदेड बाजार समितीमध्ये मंगळवार (ता. ४) पासून तर हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत हळद मार्केटमध्ये बुधवार (ता. ५) पासून हळद खरेदी सुरt झाली असल्याचे सूत्रांनी सांगितले.

दुहेरी शिक्षा ठोठावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचे परिपत्रक बाजार समित्यांकडे आलेले नाही. परंतु व्यापाऱ्यांनी या निर्णयाचा धसका घेतला आहे. जागतिक बाजारपेठेतील मूगाचे दर कमी असल्यामुळे आधारभूत किमंत दराने खरेदी करण्यास व्यापाऱ्यांनी असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे या तीन जिल्ह्यातील बाजार समित्यांतील भूसार शेतीमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार ठप्प आहेत. परंतु मंगळवार (ता. ४) पासून नांदेडमध्ये आणि बुधवार (ता. ५) पासून हिंगोलीमध्ये हळद खरेदू सुरु झाली असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, नॉन एफएक्यू दर्जाचा शेतीमाल निश्चित करण्यासाठी त्रिस्तरीय समिती स्थापन करावी. एफएक्यू दर्जाच्या शेतीमालासाठी शासनाने खरेदी केंद्र सुरु करावीत अशी मागणी परभणी कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत अडत व्यापारी महासंघाने जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांच्याकडे केल्याची माहिती महासंघाचे मोतीलाल जैन यांनी सांगितले.

# पाथरीत आज फळबाग योजनेची सोडत

**पाथरी, जि. परभणी (प्रतिनिधी) :** भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत प्रस्तावांची सोडत गुरुवारी (ता. ६) सकाळी ११ वाजता पाथरी येथील तालुका कृषी विभागाच्या कार्यालयात काढण्यात येणार आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांकडून ७ ऑगस्ट पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले होते. या प्रस्तावांची सोडतीसाठी शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी व्ही. टी. शिंदे यांनी केले आहे.

सकाळ अॅग्रोवन
www.agrowon.com
मित्र ग्लोबल शिवाराचा..
आयोजित
वनिता अॅग्रो
आय एस ओ ९००१ प्रमाणित
प्रायोजित
सकाळ अॅग्रोवन संवाद
‘अॅग्रोवन’ साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
गुरुवार, ६ सप्टेंबर २०१८ रोजी
**विषय –** द्राक्षपिक व्यवस्थापन व किटकनाशकांचा सुरक्षित वापर
**वक्ते – श्री. संजीवन दराडे**
(कृषी अधिकारी पंचायत समिती, भूम)
**श्री. विशाल मिरजे**
(द्राक्षतज्ज्ञ, वनिता अॅग्रो केम. प्रा. लि.)
**स्थळ –** पंचायत समिती सभागृह भूम, जि. उस्मानाबाद
**वेळ –** सकाळी ११.३० वा.
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# माहिती तंत्रज्ञानाचा अधिक वापर करावा : कुलगुरू ढवण

**परभणी (प्रतिनिधी) :** देश-विदेशातील कृषी संशोधनाच्या माहितीसाठी कृषी संशोधक, प्राध्यापकांनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करावा, यासाठी भारतीय कृषी संशोधन परिषदेने निर्माण केलेल्या सेरा या सॉफ्टवेअर प्रणालीच्या वापरावर भर द्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. अशोक ढवण यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील विद्यापीठ ग्रंथालय आणि परभणी येथील कृषी महाविद्यालय यांच्यातर्फे सोमवारी (ता. ३) ‘कॉन्सोरशियम ऑफ ई-रिसोर्स इन ॲग्रिकल्चर’ सेरा सॉफ्टवेअर प्रणालीबाबत प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. ढवण अध्यक्षस्थानी होते.



**परभणी : ‘वनामकृवि’मध्ये आयोजित सेरा कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. अशोक ढवण.**

शिक्षण संचालक डॉ. विलास पाटील, प्राचार्य डॉ. डी. एन. गोखले, पुणे येथील इन्फॉर्ममेटिक्सचे तज्ज्ञ मयंक डेधिया, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. संतोष कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. पाटील म्हणाले, कृषी विद्यापीठ ग्रंथालय पूर्णपणे डिजिटल झाले आहे. एका क्लिकवर विविध शोधप्रबंध, शोधनिबंध उपलब्ध आहेत. मयंक डेधिया यांनी ‘कॉन्सोरशियम ऑफ ई रिसोर्स इन ॲग्रिकल्चर’ सेरा सॉफ्टवेअर प्रणालीबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. कदम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रणजित चव्हाण यांनी केले. या वेळी प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.